21/7/98 सकाळ

# स्त्रीला समर्थ बनविण्याचे ताराराणी विद्यापीठात कार्य

**रा. कृ. कणबरकर यांचे प्रतिपादन**

**कोल्हापूर, ता. २१ : ताराराणी विद्यापीठ संस्कार केंद्र झाले आहे, असे प्रतिपादन संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य रा.कृ. कणबरकर यांनी केले.**

विद्यापीठातर्फे सौ. सरोजिनीदेवी पाटील यांना २९ व्या स्मृतिदिनामितित आदरांजली वाहण्यात आली. त्यावेळी अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. संस्थेचे अध्यक्ष रंगराव बेनाडीकर यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. प्राचार्य कणबरकर यांच्या हस्ते होतकरू विद्यार्थिनींना गणवेश वाटप झाले.

श्री. कणबरकर म्हणाले, 'व्ही.टी. पाटील व सौ. सरोजिनीदेवी यांनी त्याग करून विद्यापीठाला वाढविले. त्यांच्या जाणीवपूर्वक जगण्यामुळे विद्यापीठ संस्कार केंद्र झाले आहे. शतकानुशतके अन्याय झालेल्या स्त्रीला शिक्षित करून समर्थ बनविण्याचे कार्य ही शिक्षणसंस्था करत आहे. त्यामुळे आपणही जाणीवपूर्वक शिक्षण घेऊन समाजाचे हित साधले पाहिजे.' सौ. कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले. प्रा. इंदूलकर यांनी आभार मानले. यावेळी विद्यापीठाचे सचिव प्राचार्य क्रांतिकुमार पाटील, उपाध्यक्ष रंगराव पाटील, शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. एस.एन. पवार, इतिहास विभागाचे डॉ. अरुण भोसले उपस्थित होते.

# ताराराणी विद्यापीठाचे स्त्री शिक्षणाचे कार्य महान : प्राचार्य कणबरकर

*कोल्हापूर, दि. २१*

शतकानुशतके ज्या स्त्रीवर अन्याय झाला त्या स्त्रीस शिक्षण देऊन समर्थ करण्याचे महान कार्य ताराराणी विद्यापीठ करत आहे असे प्रतिपादन संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य रा. कृ. कणबरकर यांनी केले.

ताराराणी विद्यापीठामध्ये कै. सौ. सरोजनीदेवी तथा काकीजी यांच्या २९ वा स्मृतिदिन साजरा करण्यात आला. त्यावेळी ते अध्यक्षीय भाषणात बोलत होते.

संस्थेचे अध्यक्ष शामराव बेनाडीकर यांच्या हस्ते काकीजींच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्राचार्य कणबरकर पुढे म्हणाले, व्ही. टी. पाटील, काकींनी त्याग करुन विद्यापीठाला वाढवले, जोपासले. ते जाणीवपूर्वक जगले म्हणून ताराराणी विद्यापीठ संस्कार केंद्र बनले आहे.

यावेळी प्राचार्य क्रांतीकुमार पाटील, रंगराव दादा पाटील, डॉ. एस. एन. पवार डॉ. अरुण भोसले उपस्थित होते. प्रास्ताविक सौ. कुलकर्णी यांनी तर आभार प्रा. इंदूलकर यांनी मानले.